फौजदारी प्रक्रिया संहिता (१९७४ चे अधिनियम २) चे प्रकरण २१ अन्वये संक्षिप्त संपरिक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख

इचलकरंजी येथील न्यायदंडाधिकारी वर्ग–१, न्यायालय क्र.२ यांचे न्यायालयात

MHKO050012232026

**समरी फौजदारी केस नं. ७१५/२०२६**
निशाणी क्र.

| | |
|---|---|
| १) गुन्हा घडल्याची तारीख | दि. २८/११/२०२५ |
| २) फिर्याद दाखल केल्याची तारीख | दि. २८/११/२०२५ |
| ३) फिर्यादी यांचे नाव, वय, पत्ता इत्यादीचा तपशील | पी. ए. चव्हाण, पो.हे.कॉ.ब.नं.२५३६, शिवाजीनगर पो.स्टेशन, इचलकरंजी. |
| ४) आरोपी यांचे नाव, वय, पत्ता इत्यादीचा तपशील. | **दिपक चंद्रकांत पाटील**, व.व.३२ रा. गुलाब पैलवान चाळसमोर, भोने माळ, इचलकरंजी. |

५) दोषारोपपत्रातील गुन्हयाचा तपशील जो आरोपीस वाचून स्पष्ट करुन सांगण्यात आला तो याप्रमाणे.

दि.२८/११/२०२५ रोजी १९.१५ वाजता शाहू नगर गल्ली नं.९ समोर माऊली फॅब्रिकेशनला लागून असलेल्या एस.पी. पान शॉप येथे तुम्ही बेकायदेशीरपणे स्वत:चे फायदयाकरिता अवैधरित्या सुगंधी तंबाखू, सुगंधी सुपारी व वेगवेगळया पत्यांचे मिश्रण करून त्याचा मावा बनवून त्यावरती सुरक्षेबाबत कोणताही इशारा लिहलेला नसताना त्याची विक्री करताना मिळून आला व त्यायोगे तुम्ही सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने अधिनियम २००३ चे कलम २० प्रमाणे अपराध केलेला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या दखलगिरीत घडला आहे.

६) आरोपीचे प्रतिकथन

प्रश्न १– पोलिसांनी केलेल्या तपासकामातील कागदपत्राच्या प्रती मिळाल्या काय ?

उत्तरः– होय

प्रश्न २– दोषारोपपत्रातील गुन्हयाचा तपशील जो आता तुम्हांस वाचुन व स्पष्ट करुन सांगण्यात आला तो तुम्हांस समजला का ?

उत्तरः– होय

प्रश्न ३– सदरचा गुन्हा तुम्हांस कबुल आहे का ?

उत्तरः– होय

समक्ष

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2026.05.25 16:19:37 +0530

———————
आरोपीची सही
दि.२५/०५/२०२६

**(डी. बी. साठे)**
**न्यायदंडाधिकरी प्रथमवर्ग, न्यायालय क्रं.२,**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर**

## <u>न्यायनिर्णय</u>

## (जाहीर दिनांक २५/०५/२०२६)

आरोपीने सदरचा गुन्हा स्वत: हजर होवून कबूल केलेला आहे. आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले आरोपीने असे कथन केले की, त्याने सदरचा गुन्हा प्रथमच केला असून त्यांना कमीत कमी शिक्षा व्हावी गुन्हयाचे स्वरूप पाहता खालील प्रमाणे आदेशित केलेली शिक्षा न्यायसंगत दिसून येते

२. अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ श्री.ए.ए.गोपळकर यांनी युक्तिवाद केला. त्यांनी त्यांच्या युक्तिवादादरम्यान आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा व्हावी अशी विनंती केली. आरोपीची आर्थिक परिस्थिती व त्याच्यावर असलेली जबाबदारी या दोन्ही गोष्टी लक्षात घेता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये सिगारेट आणि इतर तंबाखू

उत्पादने अधिनियम २००३ चे कलम २० प्रमाणे केलेल्या अपराधामध्ये दोषी धरणेत येत असून रक्कम रूपये १०००/- (रूपये एक हजार फक्त ) दंड व दंड न दिल्यास तीन दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा सुनावणेत येत आहे.

२. जप्त मुद्देमाल मालमत्ता नोंद वही क्र.२०१८/२०२५, २०१९/२०२५ व २०२०/२०२५ याची अपिल कालावधीनंतर फुड इन्सपेक्टर यांनी नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

येणेप्रमाणे खुल्या न्यायालयात जाहीर.

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2026.05.25 16:19:44 +0530

दिनांक –२५/०५/२०२६
इचलकरंजी

(**डी. बी. साठे**)
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्रं.२,**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर.**